वर्ष-०९ | अंक-२९ | मुंबई, मंगळवार ०६ ते १२ जून - २०२३ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र
# POLICE BATMI PATRA

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 मधुमेहींमध्ये उन्हाळ्यात रक्तातील साखर घटण्याचे कारण काय?

3 → महासाथ किंवा अणुयुद्धाइतकाच 'कृत्रिम बुद्धिमत्ते'चा धोका?

मुंबई पोलिसांच्या पथकावर जीवघेणा हल्ला छत्रपती संभाजीनगरमधील घटना ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## शौचालयाची खिडकी तोडून पळलेल्या आरोपीचा फिल्मी स्टाईल पाठलाग, पुन्हा पोलिसांनी ठोकल्या बेड्या




पोलीस ठाण्याच्या शौचालयाच्या खिडकीतून पळ काढलेल्या आरोपीला कल्याण लोहमार्ग पोलिसांनी पुन्हा बेड्या ठोकल्या आहेत. कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्याच्या कोठडीत चौकशीसाठी असलेला आरोपीनं लघुशंका करण्याच्या बहाणा केला. यानंतर पोलिसांनी आरोपीला पोलीस ठाण्याच्या कोठडीतून बाहेर काढून पोलीस बंदोबस्तात शौचालयात नेले होते. मात्र तो ...पान २ वर...

# आर्किटेक्टचे पदव्युत्तर शिक्षण घेणारा विद्यार्थी निघाला ड्रग्ज विक्रेता !

## झटपट श्रीमंत होण्याची आयडिया अंगलट; रवानगी कोठडीत

छत्रपती संभाजीनगरच्या एका वयोवृध्द कीर्तनकारास धमकी देणाऱ्या दोघांविरोधात शहरातील वाळूज पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मला 30 हजार रुपये द्या अन्यथा तुमचे फोटो इतरांना दाखवून समाजात तुमची बदनामी करीन, अशी धमकी कीर्तनकारास देण्यात आली होती. दरम्यान सततच्या या धमकीला कंटाळून कीर्तनकाराने पोलिसात धाव घेतली होती. त्यानंतर



हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गंगापूर तालुक्यातील मांगेगाव येथील कीर्तनकार अंबादास गावंडे हे सध्या वाळूजला आपल्या कुटंबासह राहतात. तर मृदंगवादक ज्ञानेश्वर सुलाने (रा. बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर) यांच्या मध्यस्थीने कीर्तनकार गावंडे अनेक ठिकाणी कीर्तनातून प्रबोधन करण्याचे काम करतात. विशेष म्हणजे सुलानेबरोबर चांगल्या प्रकारचे ओळखीचे सबंध झाल्याने सदर कीर्तनकारांनी त्याला आपल्या घरीही अनेकवेळा आणलेले होते. अशातच 13 मे रोजी सुलाने यांनी मला वृंदावनला जायचे असल्याने अंबादास महाराज यांना 30 हजारांची मागणी केली. त्यावर कीर्तनकाराने नकार देताच त्याने माझ्याजवळ असलेले तुमचे फोटो मी इतरांना दाखवून तुमची समाजात ...पान २ वर...

## पती आणि दीर निघाले मारेकरी! महिलेचा शिरच्छेद केलेल्या हत्याकांडाची उकल




मीरा-भाईंदर परिसरातील उत्तन समुद्रकिनारी शुक्रवारी (2 जून) एका महिलेचा शिर नसलेला मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली होती. शीर नसलेलं धड समुद्रकिनाऱ्यावर पडलेल्या एका बॅगेत मिळाल्याने परिसरात भीती निर्मा ण झाली होती. पोलिसांना माहिती कळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पोस्टमॉर्टमसाठी पाठवला. याप्रकरणी उत्तन सागरी पोलिसांनी अवघ्या 24 तासात या प्रकरणाचा छडा लावला आहे. पीडित महिलेची ओळख पटली असून मृत महिला नायगाव येथील रहिवासी असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात पोलिसांनी यश मिळवलं आहे. चारित्र्याच्या संशयावरुन पतीनेच आपल्या पत्नीची गळा चिरुन हत्या केल्याचं यात उघड झालं आहे. मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी ...पान २ वर...

## खुनाच्या गुन्हयामध्ये फाशीची शिक्षा रदद करुन 25 वर्ष तुरूंगगास भोगत असलेला व जेलमधुन 02 वर्ष परागंदा झालेल्या आरोपीस अटक वालीव पोलीस ठाणेची कामगिरी.

माणिपुर पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात फिर्या दी बालन राघवन कणकरा, रा. अंधेरी पुर्व, मुंबई यांनी फिर्या दी यांचे नातेवाईक प्रभु p e r नोचल यांनी आरोपीत दिलीप प्रेमनारायण तिवारी यांची बहीण हीचे सोबत प्रेमविवाह केल्याचा राग मनात धरून वर नमुद अरोपी व त्याचे साथीदारांनी प्रभु नोचल व त्याचे तीन ...पान २ वर...



## वेश्याव्यवसाय करणा-या महिला वेश्यादलालास ताब्यात घेवुन 01 अल्पवयीन व 02 पिडित मुलींची सुटका अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईदर पथकाची कामगिरी

दिनांक ३१.०५.२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक कक्ष, भाईंदर पथकास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मिरारोड येथे राहणारी महिला वेश्यादलाल रागिनी वर्मा ही वेश्याव्यवसाय करीत असुन तीचा मोबाईल क्रमांकावर



पुरुष संपर्क साधला असता ती व्हाटसअपद्वारे पुरुष गि-हाईकांना अल्पवयीन मुली व महिलांचे फोटो पाठवुन त्यांच्याशी संपर्क साधुन मिरा भाईंदर परिसरातील लाजमध्ये गि-हाईकास रुम बुक करावयास लावुन किंवा Hager सोयीनुसार शार्ट टाईमसाठी वेश्यागमनाचा मोबदला घेवुन पुरुष गि-हाईकास ...पान २ वर...

## एकतर्फी प्रेमातून तरुणीवर चाकू हल्ला, नंतर स्वत:लाच संपवलं



राजधानी दिल्लीतून पुन्हा एकदा हादरवणारी घटना समोर आली आहे. दिल्लीतील साक्षी हत्याकांडाची घटना ताजी असतानाच आता आणखी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. दिल्लीतील बेगमपूर येथे एका सनकी तरुणाने एकतर्फी प्रेमातून तरुणीचा गळा कापला. यानंतर त्यानं स्वत: फाशी घेत आत्महत्या केली आहे. एकतर्फी प्रेमातून तरुणीवर चाकू हल्ला, नंतर स्वत:ला संपवलं पोलिसांनी मिळालेल्या माहितीनुसार, एका तरुणाने एकतर्फी प्रेमातून तरुणीवर गंभीर चाकू हल्ला केला. यानंतर स्वत:ला संपवलं. घटनेची माहिती मिळताच गंभीर जखमी तरुणीला रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, तरुणाला वाचवता आलेलं नाही. ...पान २ वर...

## गावठी हातभट्टीची दारु तयार करणा-या अड्यावर गुन्हे शाखा कक्ष 3, विरार पथकाची कारवाई

मिरा भाईदर, वसई विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात अवैद्य धंदयावर प्रभावीपणे कारवाई करुन पायबंद करणे बाबत. वरिष्ठांनी सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष ३, विरार यांना दिनांक ०२/०६/२०२३ रोजी ०५.००वा. चे सुमारास गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, विरार पुर्व, वासु पाटील यांचे शेतात, पापडखिंडी, देवीपाडा येथे बेकायदेशीर रित्या गावठी हातभट्टी दारु तयार होत आहे.



मिळालेल्या माहितीचे अनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष ३, विरारचे अधिकारी व अंमलदार यांनी वर नमुद ठिकाणी छापा कारवाई करुन १) अल्युमिनीयम धातुचे थाळीचा टाव , नळी असलेले चाटु २) २०० ...पान २ वर...

## बेकायदेशीर गर्दी व मारामारी करुन अग्निशस्त्राने दहशत माजविर्णाया आरोपीस अग्निशस्त्रासह ताब्यात घेण्यास गुन्हे शाखा कक्ष 3, विरार यांना यश

मिरा भाईदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत बेकायदेशीर अग्निशस्त्र बाळगणारे आरोपीतांबाबत वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन त्यांचा शोध घेवुन गुन्हयांना पायबंद घालणेबाबत सुचना दिल्या होत्या.
दि.२०/०५/२०२३ रोजी दुपारी १५:०० वा.च्या सुमारास मौजे धानिवबाग येथे सर्व्हे नं.११ हिस्सा नं.१/१ मध्ये नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर येथे आरोपीत नामे १)उस्मान शेख २)तारीख शेख ३)अमन शेख




४)फरमान शेख ५)उमर शेख व अनोळखी ४ ५ लोकांनी फिर्या दी व साक्षीदार यांना हाताने, लाथाबुक्यानी, लाकडी दांडक्याने मारहाण करुन यापैकी अमन शेख याने त्याचे जवळील पिस्टल ...पान २ वर...

## मजुरीच्या मोबदल्याच्या मालकाची हत्या करुन पसार झालेला आरोपी १२ तासांचे आत जेरबंद करण्यात माणिकपूर गुन्हे प्रकटीकरण पथकास यश



दिनांक ०३/०६/२०२३ रोजी रात्री २०.०० वा. चे सुमारास दिवाणमान, वसई पश्चिम येथील कासा टेरेजा या बिल्डींग बांधकामाचे साईडवरील पत्र्याचे शेड मध्ये राहणारे मो. माईन व मो. अरबाज आलम, दोघेही रा. जि. कटीहार, राज्य बिहार यांचेमध्ये मजुरीचा मोबदला देण्यावरुन झालेल्या वादातुन रागाचे भरात मो. अरबाज आलम याने मो. मोईन याचे डोक्यावर, चेहऱ्यावर व गळयावर लाकडी फळीने मारहाण करुन, गंभीर दुखापत करुन त्यास जिवे ठार मारले म्हणुन मयताचा भाऊ फिर्या दीनामे मो. आवेश मो. ...पान २ वर...

## गावठी क्ट्याचा धाक दाखवुन ज्वेलर्स दुकानदारास लुटणा-या आरोपी अटक करुन दोन गावठी को, १ जिवंत काडतुस च मोटर सायकल हस्तगत

### मिरारोड पोलीस ठा, गुन्हे शाखा कक्ष 01, काशिमीरा आि नवघर पोलीस ठाची संयुक्त कामगिरी

दिनांक २७/०५/२०२३ रोजी मिरारोड पोलीस ठाणे हद्दीतील कोठारी ज्वेलर्स दुकानात दिवसाढवळया दोन अनोळखी आरोपींनी कोठारी ज्वेलर्स दुकानाचे मालकास गावठी कट्टयाचा धाक दाखवुन ज्वेलर्स दुकानात जबरी चोरी करण्याचा प्रयत्न करुन दुकानदारासोबत झटापटी करुन दुकानदाराचा मोबाईल फोन जबरीने चोरी केल्याचा गुन्हा घडला होता. सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन, मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त यांनी सदर गुन्हयातील अनोळखी आरोपी व त्यांनी गुन्हा करतांना वापरलेले हत्यार




व वाहनाचा शोध घेणेबाबत आदेशीत केले होते. त्याप्रमाणे मिरारोड पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयसिंह बागल यांचे मार्गदर्शनाखाली मिरारोड पोलीस ठाणे व नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण कक्षातील अधिकारी व अंमलदार यांचे गुन्हयातील अनोळखी आरोपी व ..पान २ वर...

सस्नेह निमंत्रण

आरती आर्ट अकादमी आणि डिंपल पब्लिकेशन आयोजित

पुस्तक प्रकाशन सोहळा...

प्रबोधनकार ठाकरे मिनी सभागृह, बोरिवली (पश्चिम) येथे आरती आर्ट अकादमी आणि डिंपल पब्लिकेशन आयोजित कार्यक्रम पुस्तक प्रकाशन सोहळा लवकरच सादर होणार आहे.



सस्नेह नमस्कार,
'डिंपल पब्लिकेशन' या हौशी प्रकाशनाचा प्रवास हा आता सुवर्ण महोत्सवांकडे यशस्वी वाटचाल करीत आहे. याचा मोठा आनंद आहे. या सुवर्ण महोत्सवाच्यानिमित्ताने पूर्वसंध्येच्या वर्षात वेगवेगळ्या कार्यक्रमांची आम्हीं आखणी करीत आहोत.
त्यातील पहिला हा पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम, ज्येष्ठ नाटककार श्री. गंगाराम गवाणकर यांच्या 'गांजले ते गाजले' या आत्मकथनाचे प्रकाशन आणि दशावतारावर पहिले संशोधन करणारे नाटककार डॉ. अशोक भाईडकर यांच्या दुसऱ्या 'व्हर्जिन' या मराठी आणि इंग्रजी कादंबरीचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत बुधवार, दि. ७ जून २०२३ रोजी दुपारी ४ वाजता, प्रबोधनकार ठाकरे मिनी सभागृह, बोरिवली (पश्चिम), मुंबई येथे आयोजित करण्यात आले आहे.
सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते माननीय सर्वश्री डॉ. गिरीश ओक, प्रमोद पवार, प्रदीप कबरे आणि अभिनेत्री डॉ. श्वेता पेंडसे अभिवाचन करणार आहेत. कविवर्य अशोक बागवे, माजी आमदार डॉ. विनोद घोसाळकर, वसई-विरार शहर महागरपालिका प्रथम महापौर राजीव पाटील, सुप्रसिद्ध विधिज्ञ राजेंद्र पै, संपादक सुरेश कामत, साहित्य जल्लोषचे सचिव संदेश जाधव, लेखिका डॉ. सुनीता चव्हाण आणि प्रकाशक अशोक मुळे हे यावेळी उपस्थित राहून आपले विचार मांडणार आहेत.
सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी भोईर करणार आहेत.
कार्यक्रमास आपण मित्रमंडळीसह उपस्थित राहावे.
हि नम्र विनंती.

बुधवार, दि. ७ जून २०२३ रोजी दुपारी ४ वाजता

स्थळ :- प्रबोधनकार ठाकरे मिनी सभागृह, बोरिवली (पश्चिम)

पोलीस
बातमी पत्र
मुंबई
२
मुंबई, मंगळवार ०६ ते १२ जून - २०२३

# ग्रीष्म ऋतूमध्ये दिवसा झोपणे योग्य !



आयुर्वेदशास्त्राने दिवास्वाप म्हणजेच दिवसा झोपण्याचा निषेध केला आहे. दिवसा झोपण्याचे अनेक दोष आयुर्वेदाने सांगितले आहेत. त्यातही विशेषेकरून कफप्रकृती व्यक्ती, कफविकाराने ग्रस्त माणसे, स्थूल व्यक्ती यांनी दिवसा झोपू नये असे मार्गदर्शन केलेले आहे. असे असले तरी, ग्रीष्म ऋतू म्हणजे उन्हाळयामध्ये मात्र दिवसा झोपण्यास हरकत नाही,असे आयुर्वेदाचे सांगणे आहे. ग्रीष्म ऋतूमध्ये वाताचा संचय होत असताना, शरीरामध्ये निसर्गतः रुक्षत्व (कोरडेपणा) वाढत असताना व रात्र लहान असल्याने शरीराला पुरेशी झोप मिळत नसल्याने दिवसा झोपणे आरोग्यास हितकारक होते,असे मत अष्टाङ्गहृदयकार वाग्भट यांनी मांडले आहे. ग्रीष्मातल्या या उन्हाळयामध्ये रात्र छोटी असल्याने झोप पूर्ण होत नाही, त्यात पुन्हा वातावरणातला उष्मासुद्धा गाढ झोप येवू देत नाही. त्यामुळे ना सकाळी वेळेवर जाग येत, ना दिवसभर उत्साह राहात; परिणामी दिवसभराची कोणतीही कामे व्यवस्थित होत नाहीत व सतत थकवा वाटत राहतो. त्याचबरोबर मंद अग्नीमुळे व्यवस्थित अन्नही जात नाही, नीट पचतही नाही, ज्यामुळे शरीराला उर्जेची कमी भासते. उर्जेच्या अभावीसुद्धा शरीराला अशक्तपणा जाणवतो. त्यामुळे शरीराला आरामाची गरज असते. यावर उपाय म्हणूनच या ऋतूमध्ये दिवसा झोपण्याचा सल्ला दिलेला आहे. याशिवाय ग्रीष्म ऋतूमधील वातावरणामुळे जसा निसर्ग रुक्ष-कोरडा होतो तसेच शरीरसुद्धा कोरडे होते. शरीरामधील हे रुक्षत्व कमी करण्यासाठीसुद्धा दिवसा झोपण्याचा सल्ला देण्यात आला आहे. कारण दिवसा झोपल्याने स्वभावतः शरीरामध्ये कोरडेपणा कमी होऊन स्निग्धता वाढते. पावसाळा-थंडी या अन्य ऋतूंमध्ये शरीरामध्ये स्निग्धत्व वाढणे हे अनारोग्यकारक होऊ शकते. मात्र हेच स्निग्धत्व ग्रीष्म ऋतूमध्ये आरोग्यास उपकारक होते. मथितार्थाने ग्रीष्मातल्या उन्हाळयात दिवसा झोपणे हितकर आहे,हे वाचकांच्या लक्षात आले असेलच, त्यातही अशक्त, कृश व्यक्ती ज्या अशक्त आहेत किंवा थकवा व वजन कमी होणे अशी लक्षणे ज्यांच्यामध्ये दिसतात अशा आजाराने ग्रस्त व्यक्ती, लहान मुले, दिवसभर कष्ट-परिश्रम करणाऱ्या व्यक्ती, वाढत्या वयाची मुले, रात्री जागरण करणाऱ्या व्यक्ती आणि एकंदरच वात व पित्त प्रकृतीच्या मंडळींनी तारतम्याने दिवसा झोपावे.

# मधुमेहींमध्ये उन्हाळ्यात रक्तातील साखर घटण्याचे कारण काय?

वर्षा चेजे सहा ऋतू असतात, त्या सहा ऋतूंपैकी प्रत्येक ऋतूमध्ये सभोवतालचे वातावरण भिन्न असते व त्याचा मानवाच्या आरोग्यावर निश्चितपणे परिणाम होतो. तर मग रक्तामधील साखरेवर,साखरेच्या चयापचयावर, इन्सुलिनवर व ग्लुकेगॉनवर वेगवेगळ्या ऋतूंचा परिणाम होईल काय? या विषयाची माहिती घेण्यासाठी जगभरामध्ये झालेल्या विविध संशोधनांचा आधार घेतला आहे. सकाळी उपाशीपोटी केलेल्या साखरेच्या तपासणीमध्ये संशोधकांना उन्हाळ्यात साखर कमी झालेली दिसली. रक्तामधील इन्सुलिनचे प्रमाण हिवाळ्याच्या तुलनेमध्ये उन्हाळ्यात घटलेले आढळले.लहान मुलांमध्ये दिसणाऱ्या इन्सुलिन- अवलंबी मधुमेहाच्या केसेस उन्हाळ्यापेक्षा हिवाळ्यात व वसंत ऋतूमध्ये अधिक संख्येने दिसून आल्या, अर्था त उन्हाळ्यात कमी दिसल्या. त्सेन्ग या संशोधकाने मधुमेही रुग्णांवर केलेल्या संशोधनामध्ये रक्तामधील साखरेच्या पातळीची सात-आठ आठवड्यांची सरासरी दर्शविणाऱ्या HbA1C या चाचणीचा आधार घेऊन सलग दोन वर्षे निरिक्षण केले असता असे लक्षात आले की, हिवाळ्यातल्या महिन्यांमध्ये या चाचणीचे आकडे अधिक आले, अर्था त हिवाळ्यात रक्तामधील साखर नियंत्रणात राहत नसल्याचे लक्षात आले आणि जसजशी थंडी कमी होत गेली तसतशी साखरेची रक्तामधील पातळी नियंत्रणात येऊन उन्हाळ्यामध्ये या चाचणीचे आकडे कमी झाले. ग्लुकेगॉन या अन्नाच्या अभावामध्ये स्वादुपिंडामधून स्त्रवणाऱ्या संप्रेरकाचे रक्तामधील प्रमाणसुद्धा हिवाळ्याच्या तुलनेमध्ये उन्हाळ्यात कमी आढळले.

# धोका: जगभरात दरवर्षी 430 दशलक्ष टन प्लास्टिक निर्मिती; लिपस्टिक-साबणातील मायक्रोप्लास्टिकचा आरोग्यावर धोका

जगात प्रदूषण वाढत आहे. दरवर्षी 430 दशलक्ष टनांपेक्षा जास्त प्लास्टिक तयार होते. यापैकी पॉलिथिन पिशव्यांसारख्या दोन तृतीयांश प्लास्टिकच्या वस्तू लवकर खराब होतात. या प्लास्टिक प्रदूषणाचे कारण मायक्रोप्लास्टिक्स आहे, जे मानव आणि पृथ्वी दोघांच्याही आरोग्यासाठी धोकादायक आहे.

मायक्रोप्लास्टिक्स - दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या वस्तूंमध्ये - कपडे, सिगारेट, सौंदर्यप्रसाधने इत्यादींमध्ये प्लास्टिकचे छोटे कण असतात. युनायटेड नेशन्स एन्व्हायर्नमेंट प्रोग्राम (UNEP) नुसार, या गोष्टींच्या सततच्या वापरामुळे पर्या वरणात प्लास्टिकचा ढीग वाढत आहे.

मायक्रोप्लास्टिक्समुळे कसा धोका निर्मा ण होतोय..

मायक्रोप्लास्टिकचा व्यास पाच मिलीमीटरपर्यंत असू शकतो. प्लॅस्टिक उत्पादन करणाऱ्या कारखान्यातील गळतीमुळे किंवा पाईप साफ केल्यामुळे ते समुद्रात वाहून जाते. त्याचा थेट परिणाम अन्नसाखळीवर होतो. जेव्हा पक्षी, मासे किंवा सागरी प्राणी ते खातात तेव्हा हे मायक्रोप्लास्टिक विषारी आणि यांत्रिक दोन्ही परिणाम दाखवू लागतात. त्यामुळे या प्राण्यांना भूक कमी लागते. त्यांच्या वर्तनात बदल आणि अनुवांशिक उत्परिवर्तन (DNA मध्ये बदल) देखील होतात. कधी कधी श्वास घेण्यासही त्रास होतो. माणसंही सीफूड खातात. यामुळे हे मायक्रोप्लास्टिक मानवी शरीरातही प्रवेश करतात. श्वास घेताना, पाणी पिताना किंवा कधीकधी आपली त्वचा देखील हे मॅक्रोप्लास्टिक्स शोषून घेते. ते विविध मानवी अवयवांमध्ये, अगदी नवजात बालकांच्या नाळेतही आढळले आहेत. महिलांसाठी अधिक धोकादायक UNEP 2021 अहवाल- प्रदूषणापासून ते समाधानापर्यंत असे म्हटले आहे की यक्रोप्लास्टिकमध्ये



असलेल्या रसायनांचा लोकांच्या विशेषत: महिलांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो. याचा थेट परिणाम मानवी आनुवंशिकता, श्वसन दर, मानसिक विकासावर होतो. UNEP च्या सागरी आणि गोड्या पाण्याच्या शाखेच्या प्रमुख लेटिशिया कार्व्हा लो म्हणतात की मायक्रोप्लास्टिक्स आणि त्यातील रसायनांमुळे मानव आणि सागरी जीवांना धोका निर्मा ण झाला आहे त्याचा प्रसार रोखता येतो. या दिशेने काम केले पाहिजे. त्यामुळे मनुष्य व प्राण्यांचे आरोग्य दीर्घ काळ सुरळीत राहील. यासोबतच इकोसिस्टमही योग्य राहील. कपडे, सिगारेट, सौंदर्य प्रसाधने यांच्याशी मायक्रोप्लास्टिक्सचा कसा संबंध आहे... समुद्रकिनाऱ्यावर सिगारेटचा सर्वा धिक कचरा

सेल्युलोज एसीटेट फायबर हे मायक्रोप्लास्टिकचे नाव आहे. यापैकी बहुतेक सिगारेट फिल्टर समाविष्ट आहेत. जगात धूम्रपान करणारे 100 कोटी लोक दरवर्षी 6 लाख कोटी सिगारेट ओढतात. म्हणूनच हे तंतू जगाच्या कानाकोपऱ्यात पसरलेले आहेत. सिगारेटचा बहुतांश कचरा समुद्रकिनारी विखुरलेला असतो. त्यामुळे सागरी परिसंस्था मायक्रोप्लास्टिकच्या गळतीबाबत अत्यंत संवेदनशील बनली आहे.

महासागरातील 9% मायक्रोप्लास्टिक कपड्यांमधून आले पॉलिस्टर, नायलॉन, ॲक्रेलिकपासून बनवलेल्या कपड्यांमध्येही प्लास्टिक असते. कपडे-कापड बाजारात या कापडांचा वाटा 60% आहे. कपड्याच्या बाबतीत, मायक्रोप्लास्टिकला मायक्रोफायबर देखील म्हणतात. पॉलिस्टर, नायलॉन, ॲक्रेलिक कपडे वारंवार घातल्यानंतर किंवा धुतल्यानंतर हे मायक्रोफायबर बाहेर येऊ लागतात. UNEP 2020 च्या अहवालानुसार, महासागरात जमा झालेल्या मायक्रोप्लास्टिकपैकी 9% कपडे आणि कापडातून आले आहेत. हे टाळण्यासाठी पॉलिस्टर, नायलॉन, ॲक्रेलिकचे कपडे कमी धुवावेत, असे तज्ज्ञ सांगतात. नैसर्गिक साहित्यापासून बनवलेले अधिक कपडे खरेदी केल्यानेही फरक पडू शकतो.कॉस्मेटिक्समध्ये मिसळण्यासाठी मायक्रोप्लास्टिक स्वतंत्रपणे तयार केले जाते. साबण, टूथपेस्ट, डिओडोरंट्स इत्यादींना टेक्सचर देण्यासाठी मायक्रोप्लास्टिक्स जोडले जातात. मायक्रोप्लास्टिक यासाठी खास तयार केले आहे. या उत्पादनांचा वापर करून, प्लास्टिकचे लहान कण थेट आपल्या त्वचेत जातात. लिपस्टिक आणि लिपबाममध्ये मायक्रोप्लास्टिक्स देखील असतात, जे वापरल्यास थेट आपल्या पोटात जातात. काही प्रमाणात मायक्रोप्लास्टिक देखील त्वचेवर राहते. अंघोळ करताना ते वाहून जाते आणि शेवटी समुद्रात पोहोचते.

## एकतर्फी प्रेमातून तरुणीवर चाकू हल्ला, नंतर स्वत:लाच संपवलं

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आणि तरुणी दोघेही एका इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीमध्ये काम करत होते. एकतर्फी प्रेमात तरुणीचा नकार सहन न झाल्याने तरुणानं हे टोकाचं पाऊल उचलल्याचं सांगण्यात येत आहे.

युवकानं तरुणीला प्रपोज केलं होतंमिळालेल्या माहितीनुसार, या विक्षिप्त तरुणाने यापूर्वीही तरुणीला प्रपोज केले होतं, पण तरुणीने त्याला नकार दिला होता, असं सांगितलं जात आहे. या घटनेची माहिती मिळताच बेगमपूर पोलिसांनी गंभीर जखमी तरुणीला रुग्णालयात दाखल केलं. सध्या तिच्यावर उपचार सुरु आहेत त्याचवेळी तरुणाचा मृतदेह ताब्यात घेऊन पोस्टमॉर्टमसाठी पाठवण्यात आला आहे.दोघेही एकाच कंपनीत कामाला होते मीडिया रिपोर्टनुसार, ही घटना बेगमपूर पोलीस ठाण्या हद्दीतील आहे. एएनआय या वृत्तसंस्थेच्या अहवालानुसार, आरोपीचं नाव अमित असल्याचं सांगितलं जात आहे. अमित आणि तरुणी हे दोघेही रोहिणी सेक्टर 24 मध्ये असलेल्या एका इव्हेंट मॅनेजमेंट कंपनीत काम करत होते. ही कंपनी अमितच्या मोठ्या बहिणीची असल्याचं सांगितलं जात आहे. कंपनीत काम करत असतानाच अमितची तरुणीशी ओळख झाल्याचं बोललं जात आहे.

## गावठी हातभ[illegible]ची दारु तयार

लिटर क्षमतेचे १० निळया रंगाचे प्लाटीचे gH तसेच २० लिटर क्षमचेचे सफेद रंगाचे १० प्लास्टीकचे कॅन त्यात एकूण २२०० लिटर नवसागर गुळ मिश्रीत वाश ३) २० लिटर क्षमतेचे २ सफेद रंगाचे प्लास्टीकचे कन त्यात २० लिटर गैरकायदा गावठी हातभट्टीची दारु असा एकुण ०१,०९,०००/ रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला असुन इसम नामे शांताराम रघुनाथ गांगडे, रा. चिंबीपाडा, तिल्हेर रोड, ता. भिवंडी, जि ठाणे याचे विरुध्द पो.अंम. सुनील बाळासो पाटील यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्या दीवरुन विरार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नंबर ५३१/ २०२३ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ब) (क) (ड) (फ) (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष ३, विरारचे पो.नि. श्री. प्रमोद बडाख, पा.उप.नि. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, सचिन घेरे, सागर बारावकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अंम. राकेश पवार, सुमित जाधव, म.सु.ब. प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव यांनी केली आहे.

## खुनाच्या गुन्हयामध्ये फाशीची

नातेवाईक यांना ते राहत असलेल्या खैरपाडा, वसई पुर्व येथे घरात घुसुन जिवे ठार मारले होते. सदरबाबत वर नमुद फिर्या दीयांनी दिलेल्या फिर्या दीवरुन माणिकपुर पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं १४४/२००४ भा.दं.वि.सं. कलम ३०२, ३०७, ४५२, ३४ अन्वये दाखल करण्यात आला होता. दिनांक ०६/०८/२०२० रोजी मध्यवर्ती कारागृह कळंबा, जि.कोल्हापुर येथे आरोपीत दिलीप प्रेमनारायण तिवारी रा. ग्राम/पोस्ट feo, ता. बेंदकी, जि. फत्तेपुर राज्य उत्तरप्रदेश यास कोरोना महामारीमुळे महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार परोल रजेवर तुरुंग अधिक्षक यांनी रजेवर मुक्त केले होते. त्यास दिनांक २७/०५/२०२२ चे पुर्वी हजर होणे आवश्यक होते. वर नमुद आरोपीत याने हजर न होता तो फरार झालेला होता. त्यामुळे दिनांक १८/०६/२०२२ रोजी आरोपीताविरुद पो.हवा. जितेंद्र प्रभाकर बांदल नेम. कोल्हापुर मध्यवर्ती कारागृह यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्या दीवरुन आरोपीताविरुध्द वालीव पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं ६१३/२०२२ भा.दं.वि.सं. कलम २२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. वर नमुद आरोपीताचा शोध घेणेबाबत वरिष्ठांनी सुचना व मार्गदर्शन केले होते. सदरबाबत वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी उत्तरप्रदेश पोलीस व अरोपीताचे नातेवाईक यांचेकडुन माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला परंतु कोणतीही उपयुक्त माहिती मिळाली नाही. गुन्हयाचा तपास करणारे पो.उप.नि. अतुल नावले व स्टाफ यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली कि, वर नमुद गुन्हयांतील आरोपी हा पुणे जिल्हयातील भासरी येथे येणार आहे. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने सापळा कारवाई करुन वर नमुद आरोपीतास दिनांक ०१/०६/२०२३ रोजी ताब्यात घेवून अटक करण्यात आली आहे. सदरची कामगिरी श्रीमती पोर्णिमा चौगुले श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, वसई, श्री. विनायक नरळे, सहायक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, गुन्हे प्रकटिकरण पथकाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.उप.नि. अतुल नावले, पो.हवा. मुकेश पवार, किरण म्हात्रे, मनोज मोरे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, विशाल निंबाळकर, बाळु कुटे, पो.अंम. अभिजीत गढरी यांनी केली आहे.

## वेश्याव्यवसाय करणा-या महिला

वेश्यागमनासाठी अल्पवयीन मुली व महिला पुरविते. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक कक्ष, भाईंदर पथकाचे पो.नि.श्री. समीर अहिरराव यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गि-हाईक व पंच यांना महिला वेश्यादलाल हीने सुचविल्याप्रमाणे वर्धमान फन्टासीचे मेन गेटजवळील फुटपाथ, शिवार गार्डन, मिरारोड पुर्व येथे सत्यता पडताळुन पोलीस पथकासह छापा कारवाई केली असता महिला वेश्यादलाल रागिनी वर्मा हिने बोगस गि-हाईकास मुलींचे फोटो पाठवुन ०१ अल्पवयीन व ०२ पिडित मुली असे एकुण ०३ मुलींना सोबत घेवुन बोगस गि-हाईकास दाखवुन त्यांना वेश्यागमनासाठी प्रवृत्त करुन वेश्यागमनाच्या मोबदल्यात रक्कम ठरवुन स्वतःच्या उपजिवीकेकरीता रक्कम स्वीकारल्याने तिस इतर मुद्देमालासह ताब्यात घेवुन ०१ अल्पवयीन व ०२ पिडित मुली असे एकुण ०३ मुलींची सुटका करण्यात आली. सदर बाबत स.फौ. पाटील यांनी सकारतर्फे दिलेल्या फिर्या दीवरुन महिला वेश्यादलाल रागिनी वर्मा हिचेविरुध्द मिरारोड पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. ।२११/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३६६(अ), ३७०(१), ३७० (३), ३७० (४), ३७२ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ सह बालकाचे लैगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १६,१७, १८ अन्वये दिनांक ०१.०६.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुकत (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक कक्ष, भाईंदर पथकाचे पो.नि. श्री. समीर अहिरराव, स.फौ. विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पो.अंम. केशव शिंदे, चा.पो.हवा. सम्राट गावडे, महिला पो.अंम. अश्विनी भिलारे, महिला म.सु.ब.शुभांगी मोकल यांनी केली आहे.

## शौचालयाची खिडकी तोडून

शौचालयाच्या खिडकीची लोखंडी जाळी तोडून त्यामधून पळून गेला. मात्र गस्तीवरील पोलिसांनी त्याचा उल्हासनगरपर्यंत (Ulhasnagar) फिल्मी स्टाईलने पाठलाग करुन त्याला पुन्हा बेड्या ठोकल्या आहे. युवराज दिनकर सरतापे (वय 28) असं पुन्हा अटक केलेल्या आरोपीचं नाव आहे. शौचालयाची खिडकी तोडून पळला आरोपी लोहमार्ग पोलीस (Railway Police) सूत्रांकडून मिळलेल्या माहितीनुसार, अटक आरोपी युवराज सरतापे हा उल्हासनगर शहरातील लालचक्की भागात राहतो. एका गुन्ह्याच्या तपासासाठी त्याला कल्याण लोहमार्ग पोलिसांनी अटक केली आहे. त्यातच त्याला शुक्रवारी, 2 जून रोजी दुपारच्या सुमारास पोलीस कोठडीतून चौकशीसाठी गस्तीवर असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी बाहेर काढले होते. याच संधीचा फायदा घेऊन त्याने लघुशंका आल्याचा बहाणा केला. त्यामुळे लोहमार्ग पोलीस ठाण्याबाहेरील शौचालयात पोलीस बंदोबस्तात शौचालयात नेले होते. त्यानंतर शौचालयाच्या बाहेर दोन रेल्वे पोलीस त्याच्यावर लक्ष ठेवण्यासाठी तैनात करण्यात आले. आरोपीचा फिल्मी स्टाईल पाठलाग मात्र, बराच वेळ गेल्यातरी आरोपी शौचालयाच्या बाहेर येत नाही म्हणून तैनात असलेल्या हवालदार जाधव आणि पठाण यांनी शौचालयाच्या दरवाजावर टकटक केली. मात्र त्यांना आतून प्रतिसाद आला नाही. त्याचवेळी त्यांनी शौचालयाच्या दरवाजा उघडा असता तो शौचालयाच्या पाठीमागील बाजूच्या खिडकीची लोखंडी जाळी काढून, तसेच संरक्षित भिंतीवरील तार काढून आरोपी युवराजने भिंतीवरुन उडी मारून पळ काढला होता. पोलिसांनी पुन्हा आरोपीला ठोकल्या बेड्या याची चाहूल लागताच रेल्वे पोलिसांनी त्याचा उल्हासनगरमधील घरापर्यंत फिल्मी स्टाईल पाठलाग केला. पाठलाग करताना आरोपी रस्ते, गल्लीबोळातून पळून पोलिसांना चकवा देण्याचा प्रयत्न केला. मात्र आरोपीचे प्रयत्न यशस्वी झाले नाहीत. अखेर शुक्रवारी त्याला लालचक्की भागातील घराच्या परिसरातून शिताफीने अटक करण्यात आली. दरम्यान, पोलिसांच्या कोठडीतून पळाल्याप्रकरणी कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात हवालदार प्रीतम मोहिते यांच्या तक्रारीवरुन आरोपी युवराजवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आर्किटेक्टचे पदव्युत्तर

बदनामी करील अशी धमकी दिली. दरम्यान त्यानंतर मांगेगाव येथेही जाऊन अशोक गावंडे यांच्या संगतीने पुन्हा 15 मे रोजी वरील प्रकारची धमकी दिल्याचे गावंडे यांनी सदर कीर्तनकाराला कळविले. गेल्या 15 मे पासून पैसे दे अन्यथा बदनामी करील अशी सुलाने सतत धमकी देत होता. तसेच त्यांचे कोणते फोटो आहेत हे किर्तनकारालाही माहिती नाही. त्यामुळे त्रास असहय्य झाल्याने अखेर कीर्तनकार अंबादास मारुती गावंडे यांनी ज्ञानेश्वर सुलाने (रा.सासेगाव, ता. कन्नड ह. मु. बजाजनगर) अशोक बारकु गावंडे ( रा. मांगेगाव ) या दोघाच्या विरोधात वाळूज पोलिस ठाण्यात फिर्या ददिली. त्यावरून पोलिसांनी वरील दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. 'तो' फोटो कोणता? मला 30 हजार रुपये द्या अन्यथा तुमचे फोटो इतरांना दाखवून समाजात तुमची बदनामी करीन, अशी धमकी कीर्तनकारास देण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. दरम्यान यामुळे तो फोटो नेमका कोणाचा आणि त्यात काय आहे अशी देखील चर्चा यामुळे होऊ लागली आहे. तर या फोटोबाबत आपल्याला देखील काहीही माहित नसल्याचं कीर्तनकार यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. त्यामुळे पोलीस तपासातच या सर्व गोष्टी स्पष्ट होणार आहे.

## गावठी क[illegible]याचा धाक दाखवुन

गुन्हयात वापरलेले हत्याराचा शोध घेणेकरीता विशेष शोध पथक नेमण्यात आले. सदर गुन्हयाचे तपासादरम्यान सर्व प्रथम मिरारोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी सपोनि/हनिफ शेख, पोउपनि/किरण वंजारी व पथक तसेच नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी सपोनि/योगेश काळे व पथक यांनी गुन्हयाचे घटनास्थळावरील तांत्रिक माहितीचे विश्लेषण करुन गुन्हयात वापरण्यात आलेली स्कुटर हस्तगत केली व त्यावरुन आरोपी आकाश मनोज गुप्ता याला निष्पन्न केले. तदनंतर सदर गुन्हे शाखा युनिट ०१, काशिमिरा यांनी मिरा रोड पोलीस ठाणेकडुन प्राप्त माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे गुन्हयातील आरोपी आकाश मनोज गुप्ता वय २५ वर्षे सध्या रा. रुम नं.०१/जनशक्ती वेलफेअर सोसायटी, बावशेतपाडा, संतोष भवन,नालासोपारा पुर्व यास काशिमिरा परिसरातुन ताब्यात घेवुन पुढील कारवाई करीता मिरारोड पोलीस ठाणेत हजर केले असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास स.पो.नि. हनिफ शेख हे करीत आहेत. मिरारोड पोलीस ठाणे तपास पथक अधिकारी सपोनि/हनिफ शेख, पोउपनिरी/किरण वंजारी व तपास पथक यांनी नमुद अटक आरोपी आकाश मनोज गुप्ता वय २५ वर्षे याचे कडुन तपासात गुन्हयात वापरलेले दोन कावठी कट्टे, १ जिवंत काडतुस व गुन्हा करतांना वापरलेली स्कुटर असा मुद्देमाल हस्तगत केले आहे. सदरची कामगिरी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. श्रीकांत पाठक, अप्पर पोलीस आयुक्त, श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, श्री. विलास सानप तत्कालिन सहायक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग व श्री. महेश तरडे, सहायक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली मिरारोड पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजयसिंह बागल, गुन्हे शाखा युनिट ०१, काशिमीराचे पो.नि. श्री. अविराज कुऱ्हाडे, स.पो.नि. पुष्पराज सुर्वे व पथक, मिरारोड पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. हनिफ शेख, पो.उप.नि. किरण वंजारी, स.फौ. प्रशांत महाले, पो.हवा. प्रफुल्ल महाकुलकर, राहुल गावडे, प्रदीप गाडेकर, बालाजी हरणे, पो.अंम. अथर्व देवरे तसेच नवघर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील स.पो.नि. योगेश काळे, पो.हवा. पाटील, चव्हाण, पो.अंम. यादव, जाधव यांनी संयुक्तरित्या केलेली आहे.

## मजुरीच्या मोबदल्याच्या

फारुख, वय ३५ वर्षे, व्यवसाय – सेंट्रिंग वर्क, रा. एल.टी. मार्ग, बोरीवली पश्चिम, मुंबई मुळ रा. कटिहार, राज्य बिहार यांनी दिलेल्या फिर्या दीवरुन माणिकपुर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २१०/२०२३ कलम ३०२,५०४,५०६ भा.दं.वि. दिनांक ०४/०६/२०२३ रोजी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयातील आरोपी नामे मो. अरबाज मो. मिराज आलम याचे मित्र, मुळगाव, नातेवाईक, इत्यादीबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याने खुनासारख्या गंभीर गुन्हयातील आरोपीचा शोध घेणे माणिकपुर पोलीसांसमोर मोठे आव्हान होते. सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन मा. वरीष्ठांच्या मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषणाद्वारे व बौध्दीक कौशल्याचे आधारे आरोपी नामे मो. अरबाज मो. मिराज आलम, वय २५ वर्षे, रा. ग्राम बारसोई, मोलनापुर, देवगण मस्जिदजवळ, महानंदा नदीच्या बाजुला, थाना बारसोई, जि. कटीहार, राज्य बिहार यास पळुन जाण्याच्या तयारीत असताना लोकमान्य टिळक टर्मिनल, कुर्ला, मुंबई येथुन शिताफीने ताब्यात घेवुन १२ तासांचे आत गुन्हा उघडकीस आणला आहे. त्याच्याकडे केलेल्या चौकशीमध्ये त्याने मजुरीचा मोबदला देण्यावरुन झालेल्या वादातुन रागाचे भरात मालकाच्या डोक्यात लाकडी फळीने मारुन खुन केल्याची कबुली दिली आहे. सदर कारवाई श्रीमती पौर्णिमा चौगुले श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, श्रीमती पद्मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग' व श्री. संपतराव पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. अभिजीत मडके (गुन्हे), पो.नि. अशोक कांबळे (प्रशासन), गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. तुकाराम भोपळे, पो.ह. शैलेश पाटील, पो.ह. अनिल चव्हाण पो.ह. धनंजय चौधरी, पो.शि. प्रविण कांदे यांनी केली आहे.

## बेकायदेशीर गर्दी व मारामारी करुन

फिर्या दीस दाखवुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली म्हणुन पेल्हार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नंबर ४९०/२०२३ भा.दं.वि.सं. कलम १४३, १४४, १४६, १४७, १४८, १४९, ५०६ सह आर्म अक्ट ३, २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाच्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त (गुन्हे), सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष ३, विरारचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रीक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीत नामे अमानउल्ला मोहम्मद तलत शेख ऊर्फ टायगर वय रा. गरिब नवाज मशिद जवळ, वाकनपाडा, नालासोपारा यास दिनांक ०२/०६/२०२३ रोजी ५०,५००/ रुपये किंमतीचे एक पिस्तुल व एक जिवंत काडतुससह ताब्यात घेतले असुन त्यास पुढील कारवाई करीता पेल्हार पोलीस ठाणेत हजर करण्यात आले आहे. सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष ३, विरारचे पो.नि. श्री. प्रमोद बडाख, पो.उप.नि. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, सचिन घेरे, सागर बारावकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अंम. राकेश पवार, सुमित जाधव, म.सु.ब. प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव यांनी केली आहे.

## पती आणि दीर निघाले मारेकरी!

आरोपीच्या भावाने देखील मदत केल्याचं तपासात निष्पन्न झालं आहे. मयत अंजली सिंग असं 23 वर्षीय हत्या झालेल्या महिलेचं नाव असून ती नालासोपाऱ्याच्या राजीवली येथील राज एमरल्ड या इमारतीत आपला पती मिंटू सिंग, दिर चुनचुन सिंग आणि आपल्या लहानग्या बाळासह राहत होती. दीड महिन्यापूर्वी त्यांनी या सोसायटीमध्ये भाड्याने घर घेतलं होतं. मयत अंजलीचं तीन वर्षांपूर्वीच बिहारमध्ये मिंटू सिंग याच्यासोबत लग्न झालं होतं. या दोघांना दोन वर्षांचा मुलगा देखील आहे. कामानिमित्त तिचा पती मुंबईला आला आणि नालासोपारा येथे सुरक्षा रक्षक म्हणून काम करु लागला.अंजली सिंग ही मयत महिला खुल्या विचारांची होती आणि समाज माध्यमांवर (Social Media) सक्रीय देखील होती. त्याच बरोबर ती कॅटरीगचं कामही करायची, त्यामुळे ती काही वेळा 10 ते 15 दिवस घराबाहेर असायची. त्यामुळेच मिंटू सिंग याला तिच्या चारित्र्याबद्दल नेहमी संशय निर्मा णहोत होता आणि यामुळेच त्या दोघांमध्ये सतत वाद देखील सुरु होते. मिंटू सिंग याने अशाच एका वादातून 24 मे रोजी संध्याकाळी अंजलीचे शीर कोयत्याने कापले आणि तिच्या मृत मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी धडाचे दोन तुकडे करून ते सुटकेसमध्ये भरले. 25 जून रोजी रात्री 12.30 वाजता इमारतीतून मिंटू याने बॅगेत भरलेले अंजलीचे धड स्कुटीवरुन घेवून जावून, आपला भाऊ चुनचुन सिंग याच्या मदतीने ही सुटकेस भाईंदरच्या खाडीतून फेकून दिली होती. मात्र 2 जूनला अंजलीचा मृतदेह उत्तनच्या समुद्रकिनारी लागला आणि मिंटू सिंगचं बिंग फुटलं. आरोपी मिंटू सिंगने या सात दिवसांत आपल्या लहान मुलाला नातेवाईकांच्या ताब्यात देण्यासाठी हैदराबाद आणि त्यानंतर नेपाळ असा प्रवास केला होता. यात मुलाला सासऱ्याच्या ताब्यात दिल्यानंतर तो नालासोपाऱ्याला राहत असलेल्या ठिकाणी आपल्या पत्नीचे दागिने घेऊन पळ काढत असतानाच दादर रेल्वे स्थानकावर त्याला अटक करण्यात आली. सोसायटीतील लोकांना त्याने आपल्या बायकोला साथीचा रोग आल्यामुळे तिला गावी पाठवल्याचं सांगितलं.

पोलिसांना या गुन्ह्याची उकल प्रामुख्याने टॅटूच्या मदतीने झाली. सुटकेसमधील मृतदेहाच्या शरीरावर टॅटू होता, तसेच तिला बांधण्यासाठी वापरलेल्या प्लास्टिक पिशवीवर नायगाव येथील पत्ता होता. त्यामुळे ही महिला नायगाव येथे राहत असल्याचा प्रथम संशय पोलिसांना आला होता. त्यानंतर नायगाव येथील टॅटू काढणाऱ्याशी चर्चा केल्यानंतर हे टॅटू तिथेच काढलं असल्याचं स्पष्ट झालं. यात या महिलेने टॅटू उधारीवर काढला असल्यामुळे ती टॅटू काढणाऱ्याच्या संपर्का तहोती. शिवाय टॅटू काढतानाचा व्हिडीओ महिलेने समाज माध्यमांवर (Social Media)

संपादकीय...



# सुरक्षाच रुळाबाहेर



भारतीय रेल्वे हा देशभरातील कोट्यवधी लोकांच्या जिव्हाळ्याचा आणि आत्मीयतेचा विषय आहे. रस्ते वाहतुकीत कितीही गतिमान सुधारणा झाल्या आणि विमानप्रवास कितीही स्वस्त झाला, तरी बहुसंख्य जनता आजही रेल्वेनेच प्रवास करू पाहते; कारण या अवाढव्य यंत्रणेवर लोकांचा कमालीचा विश्वास आहे.

ती किफायतशीर अशी सार्व जनिक वाहतूकसेवा आहे. मात्र, ओडिशातील बालासोर जिल्ह्यात शुक्रवारी संध्याकाळी झालेल्या भीषण अपघातामुळे या यंत्रणेवरील 'आम आदमी'चा विश्वास उडण्याचा धोका निर्मा णझाला आहे आणि ती या अपघातापेक्षाही अधिक गंभीर बाब आहे.

एक मालगाडी आणि दोन प्रवासी वेगवान एक्सप्रेस गाड्या या अपघातात सापडल्या आणि फार मोठी जीवितहानी झाली. या अपघातास सिग्नल यंत्रणेतील बिघाड कारणीभूत असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे.

अन्यथा, 'लूप लाइन'वर उभ्या असलेल्या मालगाडीवर कोरोमंडल एक्सप्रेस जाऊन धडकणे केवळ अशक्य होते, असे आता हाती आलेल्या माहितीवरून दिसत आहे. यातील नेमके वास्तव चौकशीनंतरच बाहेर येईल.

अपघाताला कोणाचा हलगर्जीपणा कारणीभूत होता, कोणता तांत्रिक बिघाड झाला, सिग्नल व्यवस्थापनात नेमकी कोणती चूक झाली, अशा विविध मानवी व तांत्रिक पैलूंवर या चौकशीतून प्रकाश पडेल. घातपाताची शक्यताही तपासली जाईल.

परंतु प्रत्येकाच्या मनातला मुख्य सवाल हा आहे की, हे अमूल्य जीव आपण वाचवू शकलो नसतो का? भारतीय रेल्वेच्या इतिहासातील हा एक फार मोठा अपघात आहे. अशा दुर्घ टना होणार नाहीत, याबद्दल सरकारने, रेल्वेखात्याने जनतेला विश्वास देणे, ही सर्वा त महत्त्वाची बाब आहे.अपघातानंतर ज्या पद्धतीने वेगाने मदतकार्य सुरू झाले, जखमींचे प्राण वाचवण्याचे प्रयत्न झाले आणि अपघातग्रस्त जागीची परिस्थिती पूर्व वत करण्यासाठी परिश्रम घेतले गेले, ते कौतुकास्पद आहेत.

परंतु तरीही अशी तत्परता, कार्यक्षमता हा आपल्या व्यवस्था नि यंत्रणांचा अविभाज्य भाग का बनत नाही, तो नेहेमीच्या कार्यसंस्कृतीचा भाग का बनत नाही, हा मूलभूत प्रश्न आहे. या अपघातात सापडलेली एक गाडी अडीच तास उशिराने धावत होती, असे आढळले आहे. पण असा उशीर होणे हे अपवादात्मक नाही, ही खेदाची बाब आहे.रेल्वे अपघातानंतर जे काही घडते, तेच या वेळी पुन्हा एकदा घडू पाहत आहे आणि ते आता देशवासीयांना तोंडपाठ झाले आहे. चौकशी समिती नेमणे, विरोधकांनी रेल्वेमंत्र्यांचा राजीनामा मागणे, हा आता परिपाठ होऊन गेला आहे.परंतु यापूर्वी झालेल्या अनेक रेल्वे अपघातांनंतर नेमलेल्या चौकशी समितींच्या अहवालाचे काय झाले आणि पुढे काळजी घेण्यासाठी काय पावले उचलली गेली, हे जनतेसमोर आलेले नाही. त्यामुळेच निदान या वेळी तरी कसोशीने पाठपुरावा करून सरकार सुरक्षिततेचा काही ठोस कार्यक्रम आखेल, अशी अपेक्षा आहे.या घटनेचे राजकारण करू नका, असे आता सरकारतर्फे वारंवार सांगितले जात आहे. पण प्रश्न विचारून शंकानिरसन करून घेणे, हा केवळ विरोधकांचाच नव्हे तर जनतेचाही हक्क आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी 'कवच' ही रेल्वेची स्वयंचलित रेल्वे सुरक्षा यंत्रणा या विभागात का बसवली गेली नव्हती, असा प्रश्न उपस्थित केला.

ममतादीदींनी रेल्वेमंत्री म्हणून काम केलेले असल्याने त्यांना रेल्वे प्रशासन तसेच सुरक्षा यंत्रणा यांची माहिती असणे स्वाभाविक म्हणावे लागेल. ही यंत्रणा दोन वर्षांपूर्वी रेल्वेने अन्य खासगी कंपन्यांच्या सहकार्या ने जवळपास १७ कोटी रुपये खर्चून विकसित केली असून, या 'कवच' यंत्रणेचा बराच गाजावाजा केला गेला होता. आता ममता बॅनर्जी यांचा हा प्रश्न म्हणजे राजकारण कसे काय ठरू शकते?

गेल्या काही दिवसांत पंतप्रधान धडाधड एकामागून एक या पद्धतीने देशभरात 'वंदे भारत एक्सप्रेस'ची उद्घाटने करत आहेत. वेगवान तसेच अत्याधुनिक सुविधा असलेल्या गाड्या या रुळांवर यायलाच हव्यात. मात्र, त्या गाड्यांचा प्रवास महागडा असल्याने त्या पुरेशा क्षमतेविना चालवाव्या लागत आहेत.

लोकांची खरी गरज ही साध्या; पण किमान सुविधा असलेल्या वेगवान गाड्यांची आहे. त्यामुळे 'जनता गाड्यां'च्या आणि एकूणच रेल्वे वाहतुकीच्या सुरक्षिततेकडे अधिक लक्ष देण्याची गरज या भीषण अपघातामुळे पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. नैतिकतेच्या मुद्द्यावरून रेल्वेमंत्र्यांच्या राजीनाम्यामुळे तर काहीच साध्य होणार नाही; कारण नैतिकता नावाचा शब्दच सध्याच्या राजकारणातून हद्दपार झाला आहे.

आता चौकशीचे कर्म कांड विधिवत पार पाडले जाईल आणि काही अधिकारी वा कर्म चारीयांचे निलंबन वा बदल्याही होऊ शकतील. परंतु या तात्कालिक प्रतिसादाच्या पलीकडे जाऊन काही मूलभूत व्यवस्थात्मक बदल घडविले जाणार की नाही, हा खरा प्रश्न आहे. त्यासाठी पायाशुद्ध अग्रक्रम ठरवावे लागतील आणि सर्व पातळ्यांवर सुरक्षिततेला महत्त्व दिले जाईल, हे पाहिले पाहिजे.

## शेतकरी म्हणतात...

# भीक नको; हमीभाव द्या

"निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोफत देण्याची घोषणा करणे देशहिताचे नाही. ही रेवडी संस्कृती देशासाठी अत्यंत धोकादायक आहे. देशातील तरुणांनी याबाबत जागरुक राहिले पाहिजे. ही संस्कृती जोपासणारे राजकीय पक्ष देशाचा विकास करीत नाहीत, ते फक्त निवडणुकीत मते मिळविण्यासाठीच मोफत देण्याच्या घोषणा करतात," असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते. त्यांच्या विधानावर देशभरात मोठा गदारोळ उठला होता. अर्थतज्ज्ञांनी बाजूने आणि विरोधात मतप्रदर्शन केले होते. रेवडी संस्कृती चुकीची की बरोबर हा विषय थोडा बाजूला ठेवून महाराष्ट्रातील शिंदे-फडणवीस सरकारच्या घोषणांकडे येऊ.

राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारने, कुणा शेतकऱ्याची, शेतकरी संघटनेची मागणी नसतानाही एक रुपयात पीकविमा आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेची घोषणा राज्य सरकारने केली आहे. एक तर ही घोषणा त्यांच्याच पक्षाच्या सर्वोच्च नेत्याच्या धोरणाविरुद्ध आहे. दुसरीकडे या दोन्ही घोषणा शेतकरी हिताच्या असल्याचे सांगितले जात असले तरीही अंतिमतः त्या शेतकऱ्यांच्या हिताच्या नाहीत, हे समोर येण्यास थोडा काळ जावा लागेल इतकेच. शेतकऱ्यांसाठीच्या या दोन घोषणांना पार्श्वभूमी आहे, ती पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेची आणि कर्नाटक विधानसभा निवडणुकीची. त्यामुळे कदाचित कर्नाटक निकालाची धास्ती शिंदे-फडणवीस सरकारने घेतली असावी. पण, तो विषय बाजूला ठेवून आपण शेतीसंबंधी योजनांकडे वळू.

पंतप्रधान मोदींनी २०१८ मध्ये पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेची घोषणा केली. फेब्रुवारी २०१९ मध्ये योजना सुरू झाली. आजवर या योजनेच्या १४ हप्त्यांचे वितरण करण्यात आले आहे. आकड्यांमध्येच सांगायचे तर आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये योजना नुकतीच सुरू झाली होती, या वर्षी ६,३२२ कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. २०१९-२०मध्ये ४८, ७१६ कोटी, २०२०-२१मध्ये ६०,९९० कोटी, २०२१-२२मध्ये ६७,५०० कोटी, २०२२-२३मध्ये ६८,००० कोटी आणि २०२३-२४ मध्ये आजवर ९०,००० कोटी रुपयांचे वितरण शेतकऱ्यांना करण्यात आले आहे. म्हणजे आजवर दोन ट्रिलियन रुपयांपेक्षा जास्त रक्कम शेतकऱ्यांच्या थेट खात्यात गेली आहे. राज्याचा विचार करता तेराव्या हप्त्यापर्यंत राज्यातील ९७.९४ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात २३६०७.९४ कोटी रुपये जमा झाले आहेत.

देशातील एकाही शेतकऱ्याने किंवा शेतकरी संघटनेने किंवा कोणत्याही शेतकरी आंदोलनातून अशा प्रकारच्या मदत निधीची मागणी करण्यात आली नव्हती. २०१९च्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही योजना सुरू केली होती. महाराष्ट्राची स्थिती यापेक्षा वेगळी नाही. कोणीही मागणी केलेली नसतानाही राज्य सरकारने नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेची घोषणा केली आहे. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा लाभ घेणाऱ्या राज्यातील सुमारे १.१५ कोटी शेतकऱ्यांना वर्षाला सहा हजार रुपयांची मदत तीन टप्प्यात मिळणार आहे. त्यासाठी एक वर्षाला सहा हजार कोटींहून जास्त रकमेची तरतूद राज्य



सरकारला करावी लागेल.

एक रुपयांत पीकविमा योजना लागू करण्याची घोषणाही अशीच कोणीही मागणी न करता केलेली आहे. यंदा खरीप हंगामात ९६.६२ लाख शेतकऱ्यांनी विमा योजनेत ६५५ कोटी रुपयांचा स्वहिस्सा भरून सहभाग घेतला होता. राज्याचा हिस्सा १८७७ कोटी रुपये होता. यंदा एक रुपयात विमा असल्यामुळे मागील वर्षाच्या दुप्पट १९२ लाख शेतकऱ्यांना याचा लाभ होईल, त्यासाठी राज्य सरकाला पाच हजार कोटी रुपये मोजावे लागणार आहेत. म्हणजे या दोन्ही योजनांसाठी राज्य सरकारला सुमारे अकरा हजार कोटी रुपयांची तजवीज करावी लागणार आहे.

राज्यात सर्व काही सुरळीत आहे, शेतीमालाला चांगला भाव आहे, हमीभावाने खरेदी होत आहे, शेतीमाल साठवणुकीसाठी शीत साखळी (शीतगृहे) आणि गोदामांची मोठी व्यवस्था आहे, असा सर्वत्र आनंदी आनंद असताना ११ हजार कोटी रुपये खर्च करण्याला कदाचित कोणी आक्षेप घेतला नसता. पण, राज्यात कापूस, तूर, कडधान्यांची खरेदी हमीभावापेक्षा कमी दराने सुरू आहे. कांदा तर मातीमोल दराने विकला जात आहे. पन्नास पैसे, एक रुपया किलो दराने कांदा विकला जात आहे. तीन क्विंटल कांदा विकून चार पैसे शेतकऱ्याला मिळण्यापेक्षा शेतकऱ्याला आपल्याच खिशातील पैसे हमाली, तोलाईपोटी व्यापाऱ्यांना द्यावे लागल्याच्या घटना राज्यात घडल्या आहेत. मागील आठवड्यापासून टोमॅटो उत्पादक टोमॅटो रस्त्यावर फेकून देत आहेत.देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाल्यानंतरही ग्रामीण भागात विजेचे भारनियमन सुरू आहे. कित्येक वर्षांपासून शेतीला दिवसा अखंडित वीजपुरवठा करण्याची मागणी आहे. सौर ऊर्जेवरील कृषी पंपांना मागणी वाढत आहे, त्यांची प्रतीक्षा यादी लाखांवर गेली आहे. वीज जोडणीसाठी पैसे भरुनही सुमारे एक लाख सहा हजार शेतकरी वीज जोडणीच्या प्रतीक्षेत आहेत. अशा परिस्थितीत राज्य सरकार न मागता अकरा हजार कोटी रुपयांची खिरापत वाटत आहे. या अकरा हजार कोटी रुपयांतून निर्यात सुविधा केंद्र, शीतगृहे, गोदामे, कांदा-टोमॅटो प्रक्रिया केंद्रे, फळे, पालेभाज्यांवर प्रक्रिया करणारी केंद्रं उभारता आली असती. पण, तसे काही घडण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या खात्यात थेट निधी जमा करण्याचेच निर्णय होताना दिसतात.


स्वामिनाथन आयोगानुसार शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य हमीभाव द्यायचा असेल तर आज घडीला असलेल्या हमीभावात किमान ३० टक्क्यांनी वाढ करावी लागेल. मात्र, ही वाढ करणे सरकार जाणीपूर्वक टाळत आहे. जागतिक बाजारात तूर आणि साखर वगळता सर्व शेतीमालाचे दर वेगाने घसरत आहेत. डॉलरच्या तुलनेत रुपयाचे अवमूल्यन झाल्यामुळे शेतीमालाची निर्यात फायदेशीर ठरत असली, तरीही देशातील जनतेची भूक आणि शेतीमालाचे उत्पादन यांतील व्यस्त प्रमाणामुळे निर्यातीवर बंधने येतात.जो हक्काचा हमीभाव शेतकऱ्यांना हवा आहे, तो जाणीवपूर्वक द्यायचा नाही, केवळ शेतकऱ्यांना आम्ही खूप काही देत आहोत, असा आव आणून शेतकऱ्यांना पुन्हा भिकाऱ्यांच्या रांगेत उभे करण्याचा हा प्रयत्न आहे. शेतकरी आणि शेतकरी संघटनांनी हा डाव ओळखून वेळीच सावध होऊन, अशा फसव्या योजनांना विरोध केला पाहिजे, अन्यथा तात्पुरत्या स्वार्थासाठी दीर्घकालीन शेती आणि शेतकरी हिताला मुकावे लागेल.

# महासाथ किंवा अणुयुद्धाइतकाच 'कृत्रिम बुद्धिमत्ते'चा धोका?

ओपन एआय, 'गूगल डीपमाइन्ड', 'अँथ्रोपिक' या तीन्ही कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील कंपन्या... सॅम अल्टमन, डेनिस हसाबिस आणि डॅरिओ ॲमोडेइ हे या कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी. हे तिघे, कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील आणखी बऱ्याच उच्चपदस्थ, अधिकारी आणि अभियंत्यांसह एकत्र आले आणि मे महिन्याच्या अखेरीस एकंदर ३५० स्वाक्षऱ्यांचे निवेदन त्यांनी तयार केले. त्यात अत्यंत खरमरीत शब्दांत इशारा दिलेला होता : "झपाट्याने वाढणारे कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स - 'एआय') क्षेत्र हा महासाथरोग किंवा अणुयुद्ध यांच्यासारखाच मानवी समाजाला धोका आहे, हे ओळखून पावले टाकण्याची गरज आहे"!

ज्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेला आजचे प्रगत रूप दिले, तेच इतका गंभीर इशारा देताहेत ही निव्वळ एक विचित्र बातमी नव्हे अमेरिकेत कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राचे नियमन करावे का, केल्यास कसे करावे याचा विचार सुरू झालेला आहे. सॅम अल्टमन, डेनिस हसाबिस आणि डॅरिओ ॲमोडेइ याच तिघांनी मे महिन्याच्या सुरुवातीस अमेरिकी राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन आणि उपाध्यक्ष कमला हॅरिस यांची भेट घेऊन या धोक्यांची कल्पना दिली. त्यानंतर सिनेटच्या (अमेरिकी वरिष्ठ लोकप्रतिनिधीगृह) समितीत यावर विचार सुरू झाला.

काही स्वयंसेवी किंवा 'ना-नफा' संस्था आता कृत्रिम बुद्धिमत्ता वापराच्या विरोधात उभ्या आहेत. 'एआय सेफ्टी' या संघटनेने ३५० उच्चपदस्थांना अलीकडेच एकत्र आणले आणि 'महासाथ, अणुयुद्ध' या धोक्यांशी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अनियंत्रित, बेछूट वापराची बरोबरी केली. तर त्याआधी मार्च महिन्यात 'फ्यूचर ऑफ लाइफ इन्स्टिट्यूट' या संस्थेने एक हजार जणांच्या स्वाक्षऱ्यांचे अनावृत पत्र प्रसृत करून 'कृत्रिम बुद्धिमत्ता विकासाचे प्रयोग पुढील सहा महिन्यांसाठी पूर्णपणे




थांबवून, तेवढ्या काळात या क्षेत्राच्या योग्य नियंत्रणाचे नियम आखावेत' अशी मागणी केली. या मागणीपत्रावर ट्विटरचे सीईओ आणि 'टेस्ला'चे संस्थापक इलॉन मस्क यांचीही सही होती, पण याच क्षेत्रावर ज्यांचा व्यवसाय अवलंबून आहे, त्यांनीच नियंत्रणाची मागणी करण्याची वेळ गेल्या आठवड्यातच आली हे अधिक खरे.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकासाचे मोठे पाऊल म्हणजे १९८६ मध्ये कृत्रिम 'न्यूरल नेटवर्क'च्या रचनेचा आराखडा. त्याबद्दल तिघा शास्त्रज्ञांना अलीकडेच संगणकशास्त्रातले 'नोबेल' समजले जाणारे ॲलन ट्युरिंग पारितोषिकही मिळाले होते. मात्र यापैकी जेफ्री हिंटन आणि योशुआ बेंगिओ हे गेल्या तीन महिन्यांपासून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या धोक्यांबद्दल सावधगिरीचे इशारे जाहीरपणे देत आहेत.

या साऱ्यांना धोका वाटतो तो 'लार्ज लँग्वेज मॉडेल्स'चा. शब्द किंवा आकृती (चित्र/ व्हीडिओदेखील) काय आहे, त्याचे सार काय, त्याचे रूपांतर/ भाषांतर किती प्रकारे होईल आणि त्यापुढे वा तसे आणखी काय असेल या साऱ्या शक्यता काही क्षणांत वापरकर्त्यांना उपलब्ध करून देणाऱ्या या सुविधेच्या विकासावर 'ओपन एआय' सारख्या कृत्रिम बुद्धिमत्तेचे 'लाभ' थेट लोकांपर्यंत नेणाऱ्या कंपन्यांचा डोलारा उभा आहे. पण हे तंत्रज्ञान केवळ काही सुविधांपुरतेच न राहाता भलत्या हातांत किंवा भलत्या हेतूंसाठी वापरले गेले तर समाजात हाहाकार माजू शकतो. दुसरा अधिक स्पष्ट धोका म्हणजे नोकऱ्या जाणे. अनेक मानवी कामे कृत्रिम बुद्धिमत्ता करू शकत असल्याने काही प्रकारच्या सेवा पूर्णतः मानवरहित होऊ शकतात.

'छायाचित्रणाच्या शोधाने चित्रकारांचे काम संपले का?' यासारखे युक्तिवाद येथे लागू पडत नाहीत, हेही अनेकजण सांगत आहेत. 'एआय सेफ्टी' या संघटनेचे कार्यकारी संचालक डॅन हेन्ड्रिक्स यांनी हे युक्तिवाद खोडून काढले आहेतच. 'प्रत्येक नव्या तंत्रज्ञानाला धोकादायक समजणारे काहीजण असतात, तितके हे धोके साधे नाहीत. उलट जे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात आहेत, त्यांना तर हे धोके अधिकच जाणवत आहेत, पदोपदी जाणवत आहेत, केवळ अद्याप त्याबद्दल या क्षेत्रातले अनेकजण जाहीर वाच्यता करत नाहीत इतकेच,' असे हेन्ड्रिक्स यांनी न्यू यॉर्क टाइम्सच्या केव्हिन रूस यांना अलीकडेच सांगितले.

"कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील नवे 'उत्पादन' विकसित करण्यापूर्वी सरकारचा परवाना घेणे आवश्यक करा'' अशी स्पष्ट मागणी सॅम अल्टमन यांनी केलेली आहे. हे अल्टमन 'ओपन एआय' चे मुख्य कार्यकारी अधिकारी. याच कंपनीच्या 'चॅट जीपीटी'मुळे गेल्या सुमारे सहा महिन्यांपासून अक्षरशः जगभर खळबळ उडाली होती आणि दर आठवड्याला 'चॅट जीपीटी हेही करू शकते' वगैरे मजकूर जगभरच्या वापरकर्त्यांकडून प्रसृत होऊ लागला होता. 'हे तंत्रज्ञान चुकीच्या हातांत पडण्याचा धोका अधिकच आहे' असे अल्टमन यांचे म्हणणे, त्याला इतर उच्चपदस्थांचाही पाठिंबा आहे. त्यामुळेच आम्ही आमचे निवेदन अगदी कमीत कमी, अवघ्या २२ शब्दांचे ठेवून महासाथ किंवा अणुयुद्धाच्या धोक्याइतकाच हा धोका तीव्र असल्याचे म्हटले आहे, असे 'एआय सेफ्टी' या संस्थेचे म्हणणे.

भारतीयांच्या - किंवा जगाच्याही- दृष्टीने महत्त्वाचे हे की, सध्या तरी या कंपन्या अमेरिकी आहेत. त्यामुळे त्यांना परवाने देणार अमेरिकी सरकारच. समजा अन्य देशांतील कंपन्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात मोठी मजल मारली, तरीही अमेरिकेत व्यवसाय करण्यासाठी या अन्यदेशीय कंपन्यांनाही अमेरिकेच्या सरकारकडून परवाना घ्यावा लागणार! अर्थात, असे नियम अनेक क्षेत्रांसाठी अमेरिकेने केले आहेत आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराचे धोके परवान्यांच्या कटकटीपेक्षा अधिक महत्त्वाचे आहेत!

# मुंबई पोलिसांच्या पथकावर जीवघेणा हल्ला छत्रपती संभाजीनगरमधील घटना

छत्रपती संभाजीनगरमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली असून, तपासकामी आलेल्या मुंबई पोलिसांवर जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे. पोलीस भरती प्रकरणात झालेल्या घोटाळयातील संशयित आरोपींना ताब्यात घेण्यासाठी आलेल्या या पथकावर 30 ते 32 लोकांच्या जमावाने लाठ्या-काठ्यांसह कुऱ्हाडीने हल्ला चढवल्याने खळबळ उडाली आहे. तसेच पोलीस घोटाळयातील संशयित आरोपींना देखील जमावाने पळवून लावल्याचे समोर आले आहे. दरम्यान, या प्रकरणी वैजापूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुंबईच्या दहिसर पोलीस ठाण्याचे पोलीस शिपाई विनोद चितळकर यांनी वैजापूर पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, सद्या ते गुन्हे प्रकटीकरण पथकात कार्यरत आहे. दरम्यान पोलीस भरती प्रकरणाचा तपास करत असताना ते आपल्या पथकासह छत्रपती




संभाजीनगरच्या वैजापूर तालुक्यातील संजरपुरवाडी येथे जनकसिंह सिसोदे आणि संतोष गुसिंगे या दोन संशयित आरोपींच्या चौकशीसाठी आले होते. यावेळी त्यांच्यासोबत स्थानिक पोलीस देखील होते. दरम्यान गावात गेल्यावर त्यांनी आरोपींच्या नातेवाईकांनी आरडाओरडा करत जमाव जमा केला. तर यावेळी 30 ते 32 लोकं लाठ्या-काठ्या आणि कुऱ्हाड घेऊन जमा झाले. तसेच जमवाकडून पोलिसांना मारहाण करण्यात आली. तसेच जमावातील एकाने हातातील कुऱ्हाड घेऊन थेट पोलीस कर्मचारी विनोद चितळकर यांच्या डोक्यावर हल्ला केला. मात्र त्यांनी वेळीच स्वतःचं बचाव करत वार चुकवल्याने मोठं अनर्थ टळला. पण याचवेळी त्यांच्या ओठाला कुऱ्हाडीचा दांडा लागला.

**पोलीस कर्मचाऱ्यानेच फोनवरून दिली चिथावणी**

पोलीस भरती घोटाळयातील आरोपीला पकडण्यासाठी आलेल्या मुंबई पोलिसांवर जीवघेणा हल्ला करण्यात आला.

दरम्यान पोलीस त्यांना आपले ओळखपत्र दाखवत समजून सांगता असताना याचवेळी तिथे असलेल्या पवन बम्मनावत याने सदर ओळखपत्र पाहण्यासाठी घेवून न पाहताच हिसकावुन फेकुन दिले. तसेच विठ्ठल गबरु बम्मनावत नावाच्या व्यक्तीने पोलिसांना दम देवून थांबा, माझा मेहुणा रुपसिंग रामसिंग गुसिंगे हे पोलीस असून त्यांना फोन लावतो वं तुला दाखवित असा दम दिला. तसेच पोलीस अमंलदार रुपसिंग रामसिंग गुसिंगे यांच्या मोबाईल क्रमांक 9158****** वर फोन लावला. फोन स्पीकरवर टाकुन विठ्ठल बमनावत यांनी त्यास सांगितले की, गाडीत सात ते आठ लोक असून पोलीस असल्याचे सांगत आहे. तेव्हा फोनवर बोलत असलेला पोलीस अंमलदार म्हणाला की, गाडीची पासिंग कुठली आहे. तेव्हा विठ्ठल म्हणाला की, गाडी गडचिरोलीची आसून, पोलीस भरती पेपरचे मॅटर आहे.

त्यावेळी पोलीस अमलदार रुपसिंग रामसिंग गुसिंगे म्हणाले की, गाव गोळा करून गाडी जावू देवू नका, त्यांना सर्व मिळून निट करा व बंमकाव असे म्हणून फोन कट केला. त्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांनेच फोनवरून जमावाला चिथावणी दिल्याचे समोर आले.

# दारुड्या पोलीस निरीक्षकाचा कारनामा; कारने दोन मुलांना उडवले

सातारा: जखमी मुलांपैकी एकाची प्रकृती गंभीर आहे. दरम्यान, घटनास्थळावरील व्हिडिओ व्हायरल झाल्याने या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न करणाऱ्या पोलिसांची गोची झाली आहे. पोलीस निरीक्षक मद्यधुंद अवस्थेत: सातारा पोलीस मुख्यालयात बदली होऊन गेलेले पोलीस निरीक्षक दादासाहेब पवार हे शनिवारी रात्री साडे अकराच्या सुमारास फलटणला आले होते. दत्तनगर भागातून जात असताना त्यांच्या कारने दोन बालकांना उडवले. घटनास्थळी जमलेल्या लोकांना त्यांच्या गाडीत मद्याची बाटली आढळली. तसेच पोलीस निरीक्षक मद्यधुंद अवस्थेत होते. पोलीस निरीक्षकाला चोपले: घटनास्थळी जमलेल्या नागरिकांनी पोलीस निरीक्षक दादासाहेब पवार यांची कार थांबवली. तेव्हा ते मद्यधुंद अवस्थेत आढळून आले. तसेच कारमध्ये मद्याच्या बाटल्या होत्या. त्यामुळे संतप्त जमावाने त्याला चांगलाच चोपला. या घटनेनंतर परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.






इन्स्पेक्टरला मारहाण केल्याची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. घटनेचा व्हिडिओ व्हायरल: पोलीस निरीक्षक मद्यधुंद अवस्थेत असलेला आणि गाडीत मद्याची बाटली असणारा व्हिडिओ काढून नागरिकांनी सोशल मीडियावर व्हायरल केला होता. त्यामुळे पोलीस निरीक्षकाला वाचविण्याची धडपड करणाऱ्या फलटण पोलिसांची गोची झाली. याप्रकरणी अद्यापही गुन्हा दाखल झालेला नाही. बसला कारची धडक: चंद्रपूर जिल्ह्यात काल (रविवारी) एका प्रवासी बसला कारने धडक दिल्याने सहा जण ठार तर एक मुलगी गंभीर जखमी झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. जिल्हा मुख्यालयापासून अंदाजे 115 किमी अंतरावर असलेल्या नागभीड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कानपा गावात सायंकाळी 4 वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला.चार जणांचा जागीच मृत्यू: सहा जण नागपूरहून नागभीडकडे कारमधून जात असताना त्यांचे वाहन विरुद्ध दिशेने येणाऱ्या एका प्रवासी बसला धडकले. टक्कर इतकी भीषण होती की, कारमधील चार जण जागीच मरण पावले. त्यांचे मृतदेह कापून बाहेर काढावे लागले, असे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. अपघातात एक मुलगी व महिला गंभीर जखमी झाली. त्यांना नागभीड ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

## वडील एमडी डॉक्टर तरीही विद्यार्थ्याने भरली नाही हॉस्टेलची फी, उच्च न्यायालयाने झापले

मुंबई - पालक उच्च शिक्षित असून डॉक्टर असूनही विद्यार्थी पाल्य यश बजाज माफक फी भरत नव्हता. न्यायमूर्ती जी एस पटेल यांनी या विद्यार्थ्या ला फटकारले. टोपीवाला मेडिकल कॉलेजची राहिलेली फी त्वरित भरावी, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले. न्यायमूर्ती जी एस पटेल आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खडपीठाने आज हे आदेश दिले. एमबीबीएसचे शिक्षण घेणारा विद्यार्थी यश बजाजने त्याची ऐपत असूनही त्याचे वडील एमडी डॉक्टर तर आईदेखील नोकरी करणारी आहे. तरीदेखील त्याने माफक फी टोपीवाला मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलची भरली नाही. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने आज त्याला अक्षरशः फटकारले. तो स्वतः एमबीबीएसच्या शिक्षणासाठी मुंबईच्या टोपीवाला मेडिकल कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहे. त्याच्याकडे 44 हजार रुपये एकूण फी प्रलंबित होती. त्यामध्ये विशेषतः वसतिगृहामध्ये राहिल्याची फी प्रलंबित आहे. त्याने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. वडील एमडी डॉक्टर आई नोकरीला तरी फी थकवली - फी भरली नाही म्हणून टोपीवाला मेडिकल कॉलेजच्या प्रशासनाने यश बजाजला वारंवार मुदत वाढवून दिली. परंतु त्याने ऐकले नाही. अखेर त्याचे मूळ शैक्षणिक कागदपत्र कॉलेजच्या प्रशासनाने स्वतःच्या ताब्यात ठेवले. त्यामुळे त्याने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली. त्याला त्याचे कागदपत्र मिळावी अशी मागणी केली. या संदर्भा त न्यायालयाने विद्यार्थ्यांचे कागदपत्रे त्याला दिले पाहिजे असे आधीच्या सुनावणीत म्हटले होते. मात्र आज झालेल्या सुनावणीमध्ये तो सधन कुटुंबातला असूनही त्याने 44,000 रुपये फी ही विनाकारण थकवली आहे. ही बाब न्यायमूर्ती जी एस पटेल यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यावेळी त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला भिडली आणि त्यांनी यश बजाज या विद्यार्थ्या ला सुनावणी दरम्यान झाप-झाप झापले.

## डीजी शिपिंगचा 'तो' आदेश महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला मोठा धक्का!

**मुंबई** ेबईस्थित डायरेक्टरेट जनरल ऑफ शिपिंग ऑफ इंडियाच्या कार्यालयाने (डीजी शिपिंग) नुकत्याच जारी केलेल्या निलंबनाच्या आदेशाचा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर तसेच महाराष्ट्र राज्यात राहणाऱ्या हजारो खलाशांच्या नोकऱ्यांवर वाईट परिणाम झाला आहे. अंधेरीस्थित अँग्लो-इस्टर्न शिपमॅनेजमेंट कंपनीला कोणतीही कारणे दाखवा नोटीस जारी न करता, डीजी शिपिंगने जहाजावरील मर्चंट नेव्ही अधिकाऱ्याच्या मृत्यूशी संबंधित वर्ष २०१८ च्या जुन्या आणि न्यायालयीन खटल्याच्या आधारे कंपनीचा परवाना निलंबित केला. अँग्लो-इस्टर्नद्वारे व्यवस्थापित अँग्लो-इस्टर्नमध्ये २०,००० पेक्षा जास्त भारतीय व्यापारी नौदलाचे अधिकारी कार्यरत आहेत. अँग्लो-इस्टर्नच्या सागरी कर्मचाऱ्यांची मोठी लोकसंख्या मुंबई, नवी मुंबई, पुणे इत्यादी शहरांमध्ये राहते. अँग्लो-इस्टर्नचाही महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासात मोठा वाटा आहे. डीजी शिपिंग ही भारताच्या शिपिंग मंत्रालयाची एक शाखा आहे. न्यायालयात प्रलंबित असलेल्या कायदेशीर खटल्याशी संबंधित अँग्लो-इस्टर्न शिपमॅनेजमेंट कंपनीला दिलेला निलंबन आदेश हा भारतीय न्यायव्यवस्थेचा अनादर मानला जात असून, या आदेशाचा मुंबईत असलेल्या जहाज व्यवस्थापन उद्योगालाही मोठा धक्का बसणार आहे, कारण शिपिंग कंपनीमुळे राज्य तसेच केंद्र सरकारला भरपूर महसूल मिळत आहे.

## पर्यावरण दिनाच्या निमित्ताने मुलुंडच्या उद्यानात चिमण्यांच्या घरट्यांची स्थापना

**मुंबई (प्रतिनिधी) :** उबाठा शिवसेनेच्या वतीने पर्यावरण दिनाचे औचित्य साधत रविवारी 'या चिमण्यांनो, परत फिरारे..' या अभिनव उपक्रमाचे आयोजन मुलुंड येथे करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत मुलुंड विभागातील अनेक उद्यानात तसेच सोसायटींच्या आवारात चिमण्या व पक्ष्यांसाठीच्या सुमारे ५०० घरट्यांची स्थापना करण्यात आली. सध्याच्या काळात चिमण्यांची संख्या कमी होत असल्याने ती संख्या वाढावी यासाठी ही घरटी मुलुंडमधील अनेक झाडांवर बसवण्यात आली, असे या कार्यक्रमाचे आयोजक उपशाखाप्रमुख स्वप्निल सुर्यवंशी यांनी सांगितले. चिमण्यांची संख्या वाढावी यासाठी मुलुंडमधील निरनिराळ्या उद्यानातील झाडांवर ही घरटी बसवण्यात आली. त्या घरट्यात बाजरी, धान्य व चिमण्यांचे इतर खाद्य देखील वेळोवळी ठेवण्यात येणार आहे. या घरट्यात त्यांचे प्रजोत्पादन होवून नवीन चिमण्यांची उत्पत्ती व्हावी ह्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केला असल्याचे सूर्यवंशी यांनी सांगितले. या कार्यक्रमास ईशान्य मुंबईचे विभागप्रमुख, आमदार रमेश कोरगावकर, म. विभाग संघटक राजराजेश्वरी रेडकर, उपविभागप्रमुख दिनेश जाधव, सिताराम खांडेकर, विधानसभा संघटक गोपीनाथ पाटील, इतर महिला आणि पुरुष पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित होते. संदेश मोढवे, रोहित चिकने, प्रथमेश उतेकर, समीर सपकाळ, विनायक लोहोट यांनी या आयोजनात विशेष सहकार्य केले.

# शाहरुखच्या मुलाची चिंता करणाऱ्या ताई पीडित मुलीची भेट घेणार का?

## पुणे लव्ह जिहाद प्रकरणीच्या मोर्चात आमदार नितेश राणे यांची सुप्रिया सुळेंवर अप्रत्यक्ष टीका

'पुण्यातील मंचर आणि मुंढवा येथील अल्पवयीन तरुणीसोबत मुस्लीम तरुणांकडून अन्याय, अत्याचार केल्याची घटना पु ढे आली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील काही ताई म्हणतात की, लव्ह जिहाद, धर्मांतर या सारख्या घटना घडत नाहीत. मी त्या ताईंना एक विचारू इच्छितो की, ताई तु म्हाला शाहरुख खानच्या मुलाची चिंता आहे, या पीडित मुलींची चिंता करून त्यांची भेट घेणार का?' अशी मागणी करत भाजपाचे ने ते

### गुन्हेगारावर कठोर कारवाईची केली मागणी

आमदार नितेश राणे यांनी राष्ट्रवादी पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर अप्रत्यक्षपणे टीका के ली. पुण्यात रविवारी लव्ह जिहादच्या विरोधात घोरपडी गावात मोर्चा काढण्यात आला आहे.

पुण्यातील मुंढवा भागात राहणाऱ्या तरुणीसोबत लव्ह जिहादची घटना घडल्या प्रकरणी सकल हिंदू समाजाच्या वतीने




आयोजित करण्यात आलेल्या निषेध मोर्चाचे नेतृत्व भाजपाचे नेते आमदार नितेश राणे यांनी केले. मुंढवा येथील धर्मवीर छत्रपती संभाजी राजे चौक ते जय हिंद चौक घोरपडी दरम्यान मोर्चा काढत निषेध नोंदविला. हिंदू मुलींचा जीव घेणाऱ्या नराधम जिहादीला फाशी झाली पाहिजे, ही मागणी मोर्चात सहभागी झालेल्या महिलांनी केली.

गेल्या अनेक दिवसांपासून लव्ह जिहाद विरोधी कायदा करण्याची मागणी के ली जात आहे. पुण्यातील घोरपडी गावात लव्ह जिहादच्या विरोधात काढण्यात आलेल्या मोर्च्यात भाजप नेते आणि आमदार नितेश राणे यांनी देखील सहभाग घेतला. तर पुण्यातील पीडित तरुणीचा जो गुन्हेगार आहे त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी नितेश राणे यांनी यावेळी के ली. पुण्यातील घोरपडी गावच्या बीटी कवडे रोड ते जयहिंथ चौकापर्यंत या मोर्च्याचा मार्ग होता.

'राज्यात हिंदू मुलींचे धर्मांतर होत नाही. अन्याय - अत्याचार होत नाही. तिहेरी तलाक राहिला पाहिजे, अशा प्रकारची भूमिका राज्यातील काही नेते मंडळी घेत आहेत', अशा शब्दात नितेश राणे यांनी महाविकास आघाडीतील नेत्यांवर निशाणा साधला. तसे च या लव्ह जिहाद प्रकरणातील आरोपींना वाचविण्याचे काम काही पोलीस अधिकारी करित आहेत. त्या अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडे करणार असल्याचे ते म्हणाले.

केंद्रातील आणि राज्यातील सरकार हिंदुत्ववादी विचारांचे सरकार आहे. त्यामुळे राज्यातील हिंदूंवर कोणत्याही प्रकारे अन्याय होणार नाही, याबाबत सरकार निश्चित काळजी घेत आहे. या सर्व घटना लक्षात घेऊन लव्ह जिहाद विरोधात राज्य सरकार कायदा करणार असल्याचे नितेश राणे यांनी सांगितले.



### समुद्र सेतूवरून आता न्याहाळता येणार

# वरळी कोळीवाड्याचा सुंदर नजारा

वांद्रे - वरळी समुद्र सेतूवरून प्रवास करताना आता वरळी कोळीवाड्याचा नवा लूक न्याहाळता येणार आहे. रंगरंगोटी, सौंदर्यीकरण, आकर्षक विद्युत रोषणाईने कोळीवाडा गावठाण - झोपडपट्टी उजळून निघणार आहे. वरळी किल्ल्याचा जिर्णोध्दार व सुशोभिकरणाचे काम हाती घेण्यात आले असून भविष्यात या किल्ल्यावर पर्यटकांची संख्या वाढू शकते. या किल्ल्याशेजारीच वरळी कोळीवाडा असून जवळूनच वांद्रे - वरळी सी लिंक मार्गाशेजारीच कोळीवाडा असल्याने या मार्गावरून मोठ्या प्रमाणात मुंबईकर जनता तसेच भारतातील पर्यटकांसह परदेशी पर्यटक प्रवास करत असतात. वरळी कोळीवाडा परिसरातील या झोपड्यांमुळे बकालपणा दृष्टीस पडत असतो. एकाबाजुला मुंबईचे सौंदर्यीकरण सुरू असताना रस्ते, पदपथ तसेच सर्व विभाग सुशोभित केले जात असताना दुसरीकडे मुंबई शहरात प्रवेश करताना पर्यटकांच्या दृष्टीस हा बकालपणा पडत असल्याने महापालिका प्रशासनाने सौंदर्यीकरणा अंतर्गत येथील झोपड्यांच्या भिंतीसह छतांची रंगरंगोटी करण्याचा निर्णय घेतला आहे.

महापालिकेच्यावतीने आता कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली असून यासाठी विविध करांसह तब्बल पावणे दोन कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. या कामांसाठी एन.के.शहा इन्फ्राप्रोजेक्ट या कंपनीची निवड करण्यात आली आहे. पुढील तीन महिन्यांमध्ये या रंगरंगोटीचे काम पूर्ण केले जाणार असल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.




## राज्यपालांच्या उपस्थितीत अश्वमेध महायज्ञासाठी भूमिपूजन संपन्न

खारघर येथे २३ ते २८ जानेवारी २०२४ या कालावधीत होणाऱ्या ४८व्या अश्वमेध महायज्ञानिमित्त भूमिपूजनाचा कार्यक्रम राज्यपाल रमेश बैस यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि. ४ जून) मध्यवर्ती मैदान, खारघर येथे संपन्न झाला. अखिल विश्व गायत्री परिवार शांतिकुंज हरिद्वार या संस्थेतर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

अश्वमेध यज्ञ हे केवळ धार्मिक अनुष्ठान नाही, तर त्याचे सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरण विषयक व आध्यात्मिक महत्त्व आहे. सर्व समाजाला एकत्र घेऊन यज्ञ करीत असल्यामुळे त्यातून मतभेद मिटून एकात्मतेची भावना वाढते, असे यावेळी राज्यपालांनी सांगितले.

ते म्हणाले की, आज पर्यावरण आणि सामाजिक ऐक्याला धक्का लावणाऱ्या घटना घडत आहेत. अशावेळी अश्वमेध यज्ञाच्या माध्यमातून समष्टी, सद्भावना व मांगल्याची पुनर्स्थापना होण्याला मदत होईल. जागतिक हवामान बदलांचे परिणाम तीव्र होत असून, अलीकडच्या काळात राज्याने वारंवार दुष्काळ व पूरस्थिती अनुभवली आहे. पर्यावरण व विकास यामध्ये यांचा समतोल साधण्याची आवश्यकता आहे.

विश्वकल्याणाच्या उद्देशाने अश्वमेध महायज्ञाचे आयोजन केल्याबद्दल राज्यपालांनी अखिल विश्व गायत्री परिवाराचे अभिनंदन केले. यावेळी राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, देव संस्कृती विश्व विद्यालयाचे प्र-कुलगुरू चिन्मय पंड्या, अखिल विश्व गायत्री परिवाराचे संचालक मनुभाई पटेल, उद्योजक डॉ. निरंजन हिरानंदानी, राधिका मर्चंट, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

## भांडुप येथे संजय राऊतांविरोधात शिवसेनेचे 'जोडे मारो' आंदोलन

संजय राऊत यांच्याविरोधात भांडुप रेल्वे स्टेशन पश्चिम येथे शिवसेनेने आंदोलन केले. राऊत यांच्या प्रतिमेला जोडे मारून महिलांनी जाहीर निषेध व्यक्त केला.

शिवसेनेच्या आमदार, खासदार व नेत्यांबद्दल अपशब्द बोलणारे उबाठा गटातील राज्यसभेचे खासदार संजय राऊत यांच्याविरोधात शनिवारी आंदोलन करण्यात आले. शिवसेनेचे माजी आमदार व ईशान्य मुंबई विभाग प्रमुख अशोक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ईशान्य मुंबई विभाग प्रमुख राजश्री मांदविलकर यांच्या नेतृत्वाखाली राऊत यांच्या प्रतिमेला जोडे मारून जाहीर निषेध नोंदविण्यात आला.




पत्रकारांसमोर थुंकून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचा अवमान केल्याबद्दल संजय राऊत यांचा जाहीर निषेध नोंदविण्यात आला. राऊत यांनी वर्तनात सुधारणा केली नाही, तर प्रत्यक्ष त्यांच्या तोंडात जोडे मारून, तोंडावर थुंकून त्यांचे तोंड काळे केल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा देखील यावेळी देण्यात आला. शनिवारी सकाळी ११ वाजता केलेल्या या आंदोलनात शिवसेना भांडुप विधानसभा संघटक नेहा पाटकर, उपविभाग प्रमुख प्रकाश माने, संजय दुडे, भूषण पालांडे, देवा जाधव, तसेच महिला उपविभाग प्रमुख अंजली घाडीगावकर, वर्षा मंडलिक, शाखाप्रमुख संजय शिंदे, कार्यालय प्रमुख अजित धोत्रे व सर्व महिला शाखाप्रमुख, शाखासंघटक, उपशाखाप्रमुख, गटप्रमुख व अनेक महिला यांच्या उपस्थितीत संजय राऊत यांच्या प्रतिमेस जोडे मारून लाथांनी त्यांची प्रतिमा तुडवून प्रतिमेवर थुंकून राऊत यांचा जाहीर निषेध नोंदविला. यावेळी शिवसेनेचे अनेक कार्यकर्ते, महिला शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भांडुप पश्चिमेच्या हनुमान नगरातील गटारे तुंबलेली; सर्वत्र दुर्गंधीचा कहर

भांडुप पश्चिमेच्या हनुमान नगरातील कांबळे कंपाऊंडमधील गटारांची वेळच्यावेळी साफसफाई न झाल्यामुळे गटारांची दैनावस्था झाली आहे. पालिका प्रशासनाकडून पावसाळ्यापूर्वी छोटे नाले, गटारे यांची साफसफाई न झाल्यामुळे सर्व गटारे तुंबलेली आहेत. गटाराचे सांडपाणी खड्ड्यात तुंबल्याने मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरलेली आहे.

या विभागात ड्रेनेजच्या पाण्याचा विळखा पडल्याने परिणामी नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना व चाळीतील नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे वारंवार लक्ष वेधण्याचा प्रयत्न स्थानिक पातळ्यांवर करण्यात येत आहे. मात्र, पालिका प्रशासन व दत्तक योजनेतील



काही या प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक करीत आहेत.

पावसाळ्यापूर्वी कांबळे कंपाऊंडच्या आसपास असलेली सर्व गटारांची स्वच्छता होणे गरजेचे आहे. ती गटारे व नालेची साफसफाई अद्यापही झालेली नाही. दत्तक वस्तीच्या माध्यमातून कोणतेही काम समाधानकारक पद्धतीने केले जात नाही, त्यामुळे गेल्या तीन महिन्यांपासून सांडपाण्याचे रस्त्यावर पाट वाहत आहेत. मुंबई महानगरपालिका एस विभागाच्या प्रशासनाने याची वेळीच दखल न घेतल्यास उग्र आंदोलन छेडले जाणार असल्याचे येथील नागरिकांनी म्हटले आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्क:-9594418181 / 8424989898